# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 18 May 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १८ मे २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या प्रचार तोफा आज थंडावल्या
- राज्यात मुंबईसह १३ मतदार संघात सोमवारी मतदान–प्रशासकीय यंत्रणा सज्ज
- येत्या दोन जूनपासून पंढरपुरात विठ्ठलाचं थेट पदस्पर्श दर्शन पुन्हा सुरू

आणि

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय जोडीची पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक

****

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या प्रचाराच्या तोफा आज थंडावल्या. देशभरात सात टप्प्यात होत असलेल्या लोकसभा निवडणुकीचा हा पाचवा आणि महाराष्ट्रातला शेवटचा टप्पा आहे. या टप्प्यात राज्यातल्या उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे या १३ लोकसभा मतदारसंघात येत्या २० मे रोजी मतदान होत आहे. या सर्व १३ मतदारसंघांत एकूण २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, २४ हजार ५७९ मतदान केंद्रांवर दोन कोटी ४६ लाख ६९ हजार ५४४ मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

****

नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव इथं आज भारतीय जनता पक्ष आणि मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रचाराची उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभेनं सांगता झाली. आदित्यनाथ यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर तसंच काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका करत केली.

सभेला उपस्थित सर्व मान्यवर आणि जनसमुदायाला त्यांनी अयोद्धेत येण्याचं आणि प्रभू श्रीरामांचं जन्मभूमी मंदिरात दर्शन घेण्याचं आमंत्रण दिलं. महायुतीचे उमेदवार डॉ हेमंत सवरा यांच्या प्रचारासाठी योगी आदित्यनाथ यांनी आज पालघर जिल्ह्यात नालासोपारा इथं प्रचार सभेला संबोधित केलं.

****

महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे या पत्रकार परिषदेला उपस्थित होते. ही निवडणूक जनतेची असून, जनताच ती लढत असल्याचं खर्गे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोलतांना, आम्ही सत्तेत आल्यावर महाराष्ट्राचं वैभव परत आणू, तसंच अयोध्येतील राम मंदिराचं बांधकाम सध्या अपूर्ण असून आम्ही सत्तेत आल्यानंतर ते पूर्ण करू असं सांगितलं. शरद पवार यांनीही, विविध मुद्यांवरुन केंद्र सरकारवर टीका केली.

****

दरम्यान, देशाचा मतदार काँग्रेसच्या भूलथापांना बळी पडणार नाही, असा विश्वास मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री भाजप नेते मोहन यादव यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. सत्ता असताना १०० वेळा घटनेत दुरुस्त्या करणाऱ्या काँग्रेसला आता संविधान धोक्यात असल्याचा साक्षात्कार होत असल्याची टीका यादव यांनी केली.

****

दरम्यान, या निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चित असल्याचं, शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. आज प्रचाराची सांगता झाल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी दादर इथं शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाचं दर्शन घेतलं, त्यानंतर ते बोलत होते. आपल्याला प्रचारात नागरिकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाल्याचं, शिंदे यांनी सांगितलं.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत जाता यावं, यासाठी बेस्ट व्यवस्थापन सुमारे ६०० बस उपलब्ध करून देणार आहे. ही सेवा दिव्यांग मतदारांसाठी निःशुल्क असणार आहे.

****

मतदानाचं प्रमाण वाढावं, यासाठी मॅजेस्टिक बुक डेपोने मतदारांसाठी विशेष सवलत योजना जाहीर केली आहे. मतदान केल्याची निशाणी, मतदानाची शाई लावल्याचे बोट दाखवून पुस्तक खरेदीवर २० टक्के सवलत मिळणार आहे. मॅजेस्टिकच्या गिरगाव, दादर, ठाणे इथल्या तिन्ही शाखांसह विलेपार्ले इथलं दीनानाथ नाट्यगृह तसंच बोरिवलीत प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहात असलेल्या मॅजेस्टिकच्या बुक स्टॉल्सवरही २० मे ते २५ मे या कालावधीसाठी ही सवलत उपलब्ध असणार आहे.

****

मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली पहिल्या टप्प्यातली जमीन देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. प्रकल्पासाठी नियोजित संपूर्ण ९ पूर्णांक ६४ शतांश एकर जमीन हस्तांतरित करण्यासाठी राज्य सरकारला डिसेंबर २०२४ पर्यंत वाट पाहण्याची आवश्यकता नसल्याचं, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला यांच्या पीठानं म्हटलं आहे.

****

पंढरपूर इथं येत्या दोन जून पासून विठ्ठलाचं थेट पदस्पर्श दर्शन सुरू करण्यात येणार आहे. मंदिर व्यवस्थापन समितीनं हा निर्णय घेतल्याचं, समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितलं. मंदिरातील गाभाऱ्याच्या संवर्धन कामासाठी १५ मार्चपासून विठ्ठलाचं पदस्पर्श दर्शन बंद आहे. या काळात मुखदर्शनही दिवसातून फक्त पाच तास सुरू आहे. आता मंदिर संवर्धनाचं काम अंतिम टप्प्यात आलं आहे. त्यामुळे दोन जून पासून विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन आणि संपूर्ण दर्शन व्यवस्था पूर्ववत होणार आहे. येत्या सात जुलै पासून विठ्ठलाचे आषाढीसाठी २४ तास दर्शन सुरू असणार अशी माहिती मंदिर व्यवस्थापन समितीनं दिली आहे.

****

सोलापूर जिल्ह्यातल्या एक हजार १४७ गावात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यशासनाने शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा यासाठी दुष्काळी उपाय योजनेतून थकीत वीज देयकात ३३ पूर्णांक पाच टक्के सूट देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातल्या दोन लाख ७४ हजार ४७९ शेतकऱ्यांना, ८६ कोटी १६ लाख ६६ हजार रुपयांची सूट देण्यात आली आहे.

****

मुंबईत घाटकोपर जाहिरात फलक अपघाताच्या पार्श्वभूमीवर बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी जिल्ह्यातील सहा नगर पालिका आणि पाच नगर पंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांना शहरातले लोखंडी ढाचा वापरुन उभालेले फलक काढण्यासाठी कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार बीड नगर पालिकेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांनी बीड शहरातील ४७ ठिकाणचे लोखंडी ढाचे तात्काळ काढण्यासाठी २४ तासाची मुदत दिली आहे. जे मालक हे ढाचे काढणार नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. हे ढाचे काढण्यासाठी सोमवारपासून शहरात पालिकेच्या सहा पथकांकडून विशेष मोहीम हाती घेतली जाणार आहे.

****

धुळे तालुक्यातला बनावट देशी दारुचा एक कारखाना पोलिसांनी आज उध्वस्त केला. या कारवाईत एकूण चार लाख ३० हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी एकाला ताब्यात घेण्यात आलं असून कारखाना मालकाचाही शोध सुरू करण्यात आला आहे.

****

नांदेड पोलीस आणि स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकानं जिल्ह्यातून गहाळ झालेल्या ११८ मोबाईलचा तपास लावला आहे. १८ लाख ८५ हजार रुपयांचे एकूण मोबाईल पोलिसांनी हस्तगत केले असून, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते ६० मोबाईलचं मूळ मालकांना वाटप करण्यात आलं. उर्वरित मोबाईलच्या ईएमइआय क्रमांकाची माहिती ट्विटर वर देण्यात आली आहे.

****

भारतीय बॅडमिंटनपटू चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी यांच्या जोडीने थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. आज बँकॉक इथं झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात सात्विक चिराग जोडीने तैवानी जोडीचा २१-११, २१-१२ असा सरळ दोन गेम्समध्ये पराभव केला. उद्या तैवान आणि चिनी बॅडमिंटनपटूंच्या जोडीसोबत त्यांचा विजेतपदासाठीचा सामना होणार आहे.

****

इंडियन प्रिमियर लीग – आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज दरम्यान सामना होणार आहे. बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजल्यापासून हा सामना सुरू होणार आहे.

****

परभणीतल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या ५२ व्या वर्धापन दिनानिमित्त, खरीप पीक परिसंवाद आणि कृषी प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्याचे मृद आणि जलसंधारण विभागाचे सचिव सुनील चव्हाण यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्‌घाटन झालं. या मेळाव्यास शेतकरी बांधव, महिला शेतकरी, कृषी विस्तारक, विद्यापीठातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी आदी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथं वाळूज परिसरात आज बिबट्या आढळून आला. शेतात जाणाऱ्या महिलांना खाम नदी पात्रात बिबट्या दिसला. महिलांनी मदतीसाठी आरडाओरडा केल्यानं बिबट्या ऊसाच्या शेतात पळून गेल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देणाऱ्या आय डू- वुई डू- यू डू या नवीन अध्यापन पद्धतीवर, वाशीम जिल्ह्यातल्या अनसिंग इथल्या जिजामाता विद्यामंदिरचे उपक्रमशील शिक्षक ललित भुरे यांनी संशोधन केलं आहे. या पध्दतीचा फायदा शिक्षक आणि विद्यार्थ्यांना होणार आहे.

****